Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing… **Date: 31/05/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## बालसाहित्यिक भा. रा. भागवत



भास्कर रामचंद्र म्हणजेच भा. रा. भागवत हे बाळगोपाळांचे सर्वांत लाडके आणि मराठी बालसाहित्यकारांमधले सर्वांत लोकप्रिय लेखक व अनुवादक होते. त्यांचा जन्म ३१ मे १९१० रोजी इंदूरमध्ये झाला. मराठी बाळगोपाळांचं भावविश्व समृद्ध करण्यात त्यांच्याइतकी भरीव कामगिरी दुसऱ्या कोणत्याच साहित्यिकाने केली नसेल! एकीकडे फास्टर फेणे, बिपिन बुकलवार आणि नंदू नवाथे यांसारख्या त्यांच्या मानसपुत्रांच्या एकाहून एक विलक्षण धमाल साहसकथा, तर दुसरीकडे ज्यूल्स व्हर्न, रॉबर्ट लुई स्टीव्हन्सन, मार्क ट्वेन, लुई कॅरोल, आर्थर कॉनन डॉयल, हॉवर्ड पाईल, रॅबिले, जॉन रुडॉल्फ वाइज आणि चार्ल्स डिकन्ससारख्या ग्रेट लेखकांच्या जागतिक कीर्तीच्या कादंबऱ्यांचे मराठी अनुवाद किंवा स्वैर भाषांतरं आणि त्याबरोबर पूर्णपणे स्वतंत्र अशा-भुताळी जहाज, ब्रह्मदेशच खजिना, खजिन्याच्या बेटांवर संजूराजू, खजिन्याचा शोध - यांसारख्या धमाल कादंबऱ्यांमुळे भागवतांनी बच्चेकंपनीवर केव्हाच कायमस्वरूपी गारूड केलं होतं.

अगदी बालवयातच लेखनाला सुरुवात करणाऱ्या भागवतांनी पुढे पत्रकारिताही केली. सुरुवातीला त्यांचे माझा विक्रम, वैतागवनातील वाफारे असे विनोदी कथासंग्रह प्रसिद्ध झाले होते. त्यांनी बाळगोपाळांसाठी 'बालमित्र' नावाचं पाक्षिकही चालवलं होतं. बालपणापासूनच इंग्लिश साहित्याची आवड जोपासल्यामुळे त्यातूनच त्यांनी पुढे मुलांना भावेल असंच उत्तमोत्तम इंग्लिश साहित्य मराठीमध्ये अनुवादित केलं. आनंदी आनंद गडे, असे लढले गांधीजी, एक होते सरोवर, भटांच्या वाड्यातील भुतावळ, ढोरगावचा चोर, दुर्मिळ तिकिटाची साहसयात्रा, हजीबाबाच्या गोष्टी, हरीण बालक, झपाटलेला प्रवासी, जंगल बुकातली दंगल, खजिन्याचा शोध, मूर्तीच्या शोधात मोना, नंदू करतोय मोत्याची शिकार, उमलती कळी, भाराभर गवत यांसारखी त्यांची अनेक पुस्तकं प्रसिद्ध आहेत. २७ ऑक्टोबर २००१ रोजी त्यांचं निधन झालं.

Nashik Edition
May 31, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON, CENTRAL LIBRARY, YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401